# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- १२०-२२** **दिनांक :- २८/०४/२०२२**

## रिक्षामधून अवैध गुटख्याची वाहतूक करणाऱ्या रिक्षाचालकास अटकेत- मिरारोड पोलीसांची कारवाई.

दिनांक २७/४/२०२२ रोजी मिरारोड पोलीसांना गोपनिय माहिती मिळाली की, मिरारोड पोलीस ठाण्याचे हद्दीतुन रिक्षा क्रं. एम. एच. ०४ जेएच ६५५० हिच्यामध्ये प्रतिबंधित गुटखा, पान मसाला विक्रीकरीता घेऊन जाणार आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मिरारोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. सचिन कोतमिरे व पोलीस अंमलदार अशांनी आर. बी. के. स्कुल येथे खाजगी वाहनाने रवाना होऊन तेथे सापळा लावला असता रात्री २३.१५ वाजताचे सुमारास बातमीप्रमाणे रिक्षा क्रं. एम. एच. ०४ जेएच ६५५० वरील रिक्षाचालक हा सदरची रिक्षा तेथे घेऊन आला असता पथकातील अधिकारी त्यास पकडण्यास गेले असता त्याची चाहूल सदर रिक्षाचालकास आल्याने तो पळुन जाण्याचे प्रयत्न करीत असतांना पोलीसांनी त्यास अडवून रिक्षाची झडती घेतली असता त्यामध्ये ६१५६०/- रुपये किंमतीचा प्रतिबंधित गुटखा तसेच रोख रक्कम २२,८००/- रुपये तसेचे गुन्हयात वापरलेली १,०५०००/- रुपये किंमतीची ऑटोरिक्षा मिळून आली आहे. सदर कारवाई दरम्यान एकुण १,८९,३६०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाईबाबत मिरारोड पोलीस ठाणे येथे गु. रजि.नं. १८३/२०२२ भादंवि कलम ३२८, १८८, २७३, ३४ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ चे कलम २६ (२) (iv), ३०(२) (a) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी नामे १. रामचंद्र जगमोहन चौरसिया व २. धनराज रामनारायण मौर्या यांना अटक अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, श्री. विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विजयसिंह बागल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिरारोड पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक श्री. सचिन कोतमिरे, पोलीस हवालदार श्री. राहुल गावडे अशांनी केली आहे.